# स्मार्ट सिटी म्हणून विकास करतांना शहराची मूळ ओळख पुसली जावू नये: महापौर श्री. प्रवीण दटके

नागपूर स्मार्ट सिटी संदर्भात सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे दृष्टीने स्टेक होल्डर समवेत फ्रेंच चमूची कार्यशाळा संपन्न. नागपूर शहराचा स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्यासाठी निवड होण्याकरीता यापूर्वी दिलेला म.न.पा.चा प्रस्ताव चांगला होता. तथापी केंद्र शासनाने जे काही निष्कर्ष लावले होते त्याआधारे त्यामध्ये काही त्रृटी असतील त्या दुरूस्त करण्यात येत आहे. विशेषतः शहरात म.न.पा. व नासुप्र ही दोन विकास प्राधिकरणे असली तरी स्मार्ट सिटीसाठी जी स्पेशल पर्पज व्हेईकल गठीत होणार आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधीसह सर्वांना प्रतिनिधीत्व असणार असल्यामुळे सादर होणारा प्रस्ताव सर्वसमावेशक राहील. तथापी ज्याठिकाणी विकास करायचा आहे त्याभागात जावून संबंधित नागरिकांची मते जाणून घेतली पाहिजे. स्मार्ट सिटी अंतर्गत सध्या देण्यात येत असलेल्या सुविधा अधिक प्रभावीपणे देता आल्या पाहिजे. तसेच सर्वसामान्य नागरिकांना परवडेल असा शहराचा विकास व्हावा, आम्हाला नागपूर शहराची मूळ ओळख कायम ठेवून हा विकास करावयाचा असल्याने माध्यम प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थानी जनता व प्रशासन यांना जोडणारा दुवा म्हणून (ॲम्बेसेडर) म्हणून काम करावे, अशी अपेक्षा मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी व्यक्त केली.

केंद्र सरकाने फ्रेंच सरकारशी केलेल्या सामंजस्य करारानुसार देशातील नागपूर, चंदीगड आणि पुड्डुचेरी या तीन शहरांना स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्याचे दृष्टीने तांत्रिक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून फ्रेंच डेव्हलपमेंट एजन्सी (AFD) मागील आठवडयापासून नागपूर शहरात असून त्यांनी त्रृटी दूर करून सुधारित प्रस्ताव तयार करण्याचे दृष्टीने सर्व संबंधित घटकांना या प्रक्रियेत सामील करून घेण्यासाठी व त्यांची मते जाणून घेण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन आज म.न.पा. राजे रघुजी भोसले नगरभवन (महाल टाऊन हॉल) येथे केले होते.

यावेळी व्यासपीठावर मा. महापौर श्री. प्रवीण दटके, उपमहापौर श्री. सतीश होले, सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी, आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, बसपा पक्षनेता श्री. गौतम पाटील, फ्रेंच एजन्सी ( AFD ) एस्पेलियाचे उपमहासंचालक क्लिमेंट फोर्ची, लिऑन अर्बन प्लॅनिंग, एजेन्सीचे नगररचनाकार सेबेस्टीयन रोलॉन्ड व पॅट्रीक बर्जर विराजमान होते. यावेळी आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांनी कार्यशाळेचा उद्देश विशद करून पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे नवीन प्रस्तावामधील महत्वाच्याबाबीकडे लक्ष वेधले. त्यामध्ये रिट्रोफिटींग, रिडेव्हलपमेंट व ग्रीनफिल्डस, स्मार्ट सिटी अहवालाचे स्वरूप, जमेच्या बाजू व अडचणी इ. विविध विषयावर चर्चा केली. तसेच शहराचा स्वच्छ, सुंदर, हिरवे व सुरक्षित शहर त्याचबरोबर पर्यावरणपूरक, माहिती तंत्रज्ञान व शैक्षणिक दृष्टीने उपयुक्त शहर म्हणून विकास होण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने शहराचे वेगवेगळया भागाची आवश्यकता व उपलब्ध भौगोलिक परिस्थिती विचारात घेवून तयार केलेल्या प्रस्तावाची माहिती त्यांनी दिली.

यावेळी फ्रेंच चमूने सुधारित प्रस्तावाचे अनुषंगाने पॉवर पॉईंट द्वारे पारडी, भवानीनगर येथील जमीनीचा विकसित प्रस्ताव, शहरातील नागनदी व नदी स्वच्छता प्रस्ताव याबाबत माहिती दिली. तसेच सुरू असलेल्या व प्रस्तावित प्रकल्पांची

माहिती घेतली. त्यानंतर सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी यांनी देखील मार्गदर्शन केले. दुसऱ्या फेरीसाठी स्मार्ट सिटीचा प्रस्ताव जून अखेर पर्यंत केंद्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाला सादर करावयाचा आहे.

यावेळी स्मार्ट सिटी संदर्भात झालेल्या चर्चेत विविध क्षेत्रातील प्रतिनिधीनी भाग घेवून माहिती घेतली व उपयुक्त सूचना केल्या. प्राप्त झालेल्या सूचनांचा अंतर्भाव सुधारित प्रस्तावात करण्यात येईल. तसेच यासाठी विविध क्षेत्रातील नागरिक संस्था यांना स्मार्ट सिटीबाबत आपल्या सूचना म.न.पा. कडे तसेच वेबसाईटवर पाठविता येतील असेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेला अतिरिक्त आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, स्थापत्य समिती सभापती श्री. सुनील अग्रवाल, झोन सभापती श्रीमती विद्या कन्हेरे, निलिमा बावणे, महिला बाल कल्याण समिती सभापती श्रीमती रश्मी फडणवीस, नगरसेविका श्रीमती वर्षा ठाकरे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अधीक्षक अभियंता श्री. शशिकांत हस्तक, आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद गणवीर यांचेसह सर्व विभागप्रमुख, कार्यकारी अभियंता व सहायक आयुक्त, तसेच कान्फेडरेशन ऑफ ऑल इंडीया ट्रेडर्सचे बी.सी. भरतीया, व्ही.टी.ऐ.चे जे.पी. शर्मा, तेजींदरसिंग रेणु, नागपूर रेसिंन्डेंसीयल असो.चे इंदरजितसिंग बावेजा, एम.एडी.सी. मिहानचे अतुल ठाकरे, एन.एस.सी.सी. चे विक्रम नायडू, हेमंत लोढा, एस.एन.डी.एल.चे राजेश तुरक, दिपक लाबडे, एम.टी.डी.सी.चे हनुमंत हेडे, एम.एम.ई.डी.सी.एल.चे अधीक्षक अभियंता मनीष वाठ, प्रसिस्टंटचे शाकाल शुल्का, आर्किटेक आनंद चाटी यांचेसह विविध संस्थाचे पदाधिकारी, वर्तमानपत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन अति. उपायुक्त श्री. जयंत दांडेगावकर तर आभार प्रदर्शन कार्य. अभियंता श्री. महेश गुप्ता यांनी केले.



# 5 जून 2016 ला जागतिक पर्यावरण दिना निमित्त स्वयंसेवी संस्थेच्या सहभागाने जनजागृती अभियान राबविणार.... मा.महापौर श्री.प्रवीण दटके



दिनांक 5 जून हा दिवस सर्वत्र जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने सुध्दा 5 जून 2016 ला जागतिक पर्यावरण दिना निमित्त नागपूर शहरातील प्रमुख चौकात पर्यावरण प्रेमी स्वयंसेवी संस्थेच्या सहभागाने जनजागृती अभियान राबविण्याच्या दृष्टीकोनातुन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी करावयाच्या पूर्व तयारीसाठी म.न.पा.पदाधिकारी/अधिकारी, आमदार, सर्व झोन सभापती, स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त यांच्या समवेत चर्चा करून त्यांची मते जाणून घेतली. बैठकीला माजी महापौर व आमदार प्रा.अनिल सोले, मा.उपमहापौर श्री.सतिश होले, मा.सभापती स्थायी समिती श्री.सुधिर राऊत, सत्तापक्ष नेते श्री.दयाशंकर तिवारी, मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, शिक्षण समिती सभापती श्री.गोपाल बोहरे, सत्तापक्ष उपनेत्या श्रीमती निता ठाकरे, जैविक विविधता समिती सभापती श्रीमती दिव्याताई धुरडे, लक्ष्मीनगर झोन सभापती श्रीमती निलिमा बावणे, धरमपेठ झोन सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, हनुमाननगर झोन सभापती श्रीमती स्वाती आखतकर, धंतोली झोन सभापती श्रीमती सुमित्रा जाधव, लकडगंज झोन सभापती श्रीमती कांता रारोकर, गांधीबाग झोन सभापती श्रीमती विद्या कन्हेरे, मंगळवारी झोन सभापती श्री. अरूण डवरे, अपर आयुक्त डॉ.आर.झेड.सिद्दीकी, अपर आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, उपायुक्त डॉ.रंजना लाडे, अति.उपायुक्त श्री.प्रमोद भुसारी, श्री.जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता श्री.उल्हास देबडवार, ग्रीन व्हीजल फाउंडेशनचे श्री.कौस्तुव चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, आकांशा बोरकर, वृक्षसंवर्धन समितीचे श्री.बाबा देशपांडे, नेचर ॲण्ड कल्चर संस्थेचे श्री.आनंद कोतेवार, निसर्ग विज्ञान मंडळाचे डॉ.विजय घुगे, महाराष्ट्र इन्वायरी पावर लिमीटेडचे डॉ.डी.जी.बत्तलवार, डी.आर.चिंचमलातपुरे, निशांत गांधी, आरती तापस, उपसंचालक (आरोग्य) डॉ.मिलींद गणवीर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, उद्यान अधिक्षक श्री.सुधिर माटेसह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त प्रामुख्याने उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी मा.महापौरांनी 5 जूनला जागतिक पर्यावरण दिना निमित्त शहरातील प्रमुख चौकात/वस्त्यांमध्ये तसेच सर्व

झोन निहाय काय कार्यक्रम घेता येईल याबाबत चर्चा करण्यास्तव आज बैठक घेण्यात येत आहे. भविष्यात जलस्त्रोतांचे संरक्षण व प्रदुषणामुळे तलाव नदया प्रदूषीत होवू नये याकरिता म.न.पा.च्या वतीने शहरातील जनतेमध्ये जनजागृती निर्माण व्हावी या दृष्टीने नाग-नदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या एकूण 42 कि.मी.पैकी 28 किलोमिटर पर्यंत नदीची स्वच्छता करण्यात आली आहे, अशी माहिती देवून 5 जूनला देखील पर्यावरण दिनानिमित्त होणाऱ्या जनजागृती अभियानात जास्तीत-जास्त नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी केले.

बैठकीत उपस्थित पर्यावरण स्वंयसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उपयुक्त अश्या सूचना मांडल्यात. आमदार प्रा.अनिल सोले यांनी पर्यावरण संबंधी वर्षभर काही ना काही ॲक्टीव्हीटी सुरू असायला हवी याकरिता म.न.पा.चा एखादा अधिकारी याचकामाकरिता नियुक्त करावा जो स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधेल असे मत त्यांनी बैठकीत मांडले.

बैठकीत मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी विद्याथ्र्यांमध्ये पर्यावरण संबंधी जन-जागृती करण्याचे दृष्टीने कार्यक्रम राबवावा. स्वयंसेवी संस्थेने या अभियानात 'चळवळ' म्हणून सहभागी व्हावे असे आवाहन केले.

5 जूनला म.न.पा.तर्फे पर्यावरण दिन साजरा करण्यात येणार असून यानंतरही वर्षभर पर्यावरण रक्षणाचे विविध कार्यक्रम झोन स्तरावर आयोजित करण्यात यावे. याबाबत प्रत्येक झोननी पर्यावरणाबाबत विविध कार्यक्रम झोन सभापती व सहाय्यक आयुक्तांच्या समन्वयाने रूपरेषा, नियोजन व अभिनव असा प्रयोग करण्याचे निर्देश सर्व झोनच्या सहाय्यक आयुक्तांना मा.महापौर प्रवीण दटके यांनी दिलेत.

# पर्यावरण दिनानिमित्त अंबाझरी दहन घाटावर म.न.पा.व वंसुधरा वुडलेस किमेशनतर्फे हरित शवदाह प्रणालीचे लोकार्पण

जागतिक पर्यावरण दिनाच्या पर्वावर आज सकाळी नागपूर महानगरपालिका व वसुधा वुडलेस क्रिमेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाझरी स्मशानभुमी पर्यावरण पुरक घोषीत करण्यासाठी काष्ठ विरहीत दहन संस्कार प्रणालीचा संकल्प करण्यात आला. यावेळी मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी अंबाझरी घाट परिसरात वृक्षारोपण करून या प्रणालीचे लोकार्पण केले. त्यानंतर ना.सु.प्र.च्या नवैद्यम सभागृह येथे पार पडलेल्या काष्ठ विरहित दहन संस्कार लोकार्पण सोहळा मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांचे उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर वसुधा वुडलेस क्रियेशनचे डॉ.संजय जयपुरकर




(चैन्नई) श्री.विजय लिमये, प्रशांत वैरागडे, प्रशांत तितरे, रमेश सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. पर्यावरण पुरक हरित दहन संस्कार उपक्रमाबाबत माहिती देतांना डॉ.संजय जयपुरकर यांनी सांगितले मोक्षकाष्ठ (बायो कोला अथवा ब्रिकेटस) याची निर्मिती शेतीतील हिरव्या टाकाऊ कचऱ्यापासून करण्यात येते. शेंगदाना टरफल, उसाचे चिपाड, सोयाबिन, कुटार, कापसाचे झाड, तांदळाचे कुटार इत्यादीपासुन हे मोक्षकाष्ठ करण्यात येतात. ते विटाच्या स्वरूपात असुन त्याचा उपयोग दहनासाठी शेण्याच्या गोवऱ्यासोबत केला जाऊ शकतो. लाकडाच्या तुलनेत मोक्षकाष्ठाची कॅलोरिफीक व्हॅल्यु दुप्पट आहे. त्यामुळे अगनीत वृक्षांची कत्तल थांबविण्यात पर्यावरण पुरक अंत्य संस्कार प्रणाली कशी उपयुक्त आहे याची माहिती त्यांनी दिली. मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी मोक्षकाष्ठ व्दारे दहन करण्याचा उपक्रम अत्यंत चांगला व पर्यावरणाच्या दृश्टीने उपयुक्त आहे. अंबाझरी घाटावर सर्व सुविधा निशुल्क उपलब्ध असुन आपल्या घरातुन प्रथम हे उपक्रम सुरू झाले पाहिजे त्याकरिता जनजागृती होणे गरजेचे आहे. म.न.पा.पर्यावरणा करीता पूरक विविध उपक्रम राबवित असुन विद्युत दाहिनी, गोवऱ्या व एल.पी.जी.वर अंत्य संस्कार केल्याने लाकडाची बचत होते. म.न.पा.पर्यावरणरक्षणार्थ गणेश मुर्ती विसर्जनाकरीता कृत्रीम टाकयाची व्यवस्था करून तसेच प्लॅस्टीक मुक्त शहर करण्याचा संकल्प केला आहे. नदी नाल्याची स्वच्छता आदी अभियानाबाबत जागृती करीत आहे. हे सर्व उपक्रम लोकसहभागातुन करण्याकरीता जनतेच्या सहकार्याची व सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे असे सांगितले. प्रारंभी सर्व धर्मीय प्रार्थना व शांतीपाठ करण्यात आला. कार्यक्रमात म.न.पा.वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार, नदया व सरोवरे प्रकल्प प्रमुख मो.इसराईल, आरोग्य झोनल अधिकारी श्री.महेश बोकारे, विश्वहिंन्दु परिषदेचे श्रीकांत आगलावे तसेच विविध संस्थांचे पदाधिकरी व गणमान्य नागरिक उपस्थित होते. यावेळी मा.महापौर यांचे हस्ते सांत्वणा परिवाराच्या नामफलकाचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती ममता चिंचवडकर तर आभार अपर्णा जैन यांनी केले.

# "थमती सांसे मिटती पहचान" जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नाग नदी व ग्रीनव्हिजल फाउंडेशनचे उत्कृष्ठ पथनाटय



नागपूरची ओळख असलेल्या नागनदीचे आजचे दुर्गंधीयुक्त स्वरूप दूर होईल व नदीला पूर्वीचेच स्वच्छ, निर्मल वाहणारे नदीचे स्वरूप प्राप्त होईल, असा दुर्दम्य आशावाद घेवून आजच्या जागतिक पर्यावरण दिनी नागपूर महानगरपालिकेने ग्रीन व्हीजील फाऊंडेशच्या सहकार्याने सकाळी मेडीकल चौकात पथनाटय आयोजित केले होते.

आज 2016 वर्षामधून चक्क 100 वर्षापूर्वीचे नागपूरचे 1916 चे नाग नदीचे स्वरूप ग्रीन व्हीजील फाऊंडेशनचे कौस्तुव चटर्जी यांनी पथनाटयाव्दारे रामखिलावन या पात्राचा नागनदीशी संवाद साधुन विनोदप्रचुर परंतु लोकांना प्रबोधनपर संदेश देवुन गेला. 100 वर्षापूर्वी नदीचे संगमावर असलेले मंदीर व नदीकाठावर आन्हीक उरकणारे धार्मिक व्यक्ति, नदीच्या पाण्यात आंघोळी करणारी व्यक्ती, कपडे धुणे, एवढेच नव्हे तर पिण्यासाठी पाणी घेवून जाणारे व्यापारी व्यक्ति इ. विविध सामाजिक स्तरातील व्यक्तिच्या माध्यमातुन नागनदीचे स्वच्छ चित्र उभे केले. त्याबरोबरच नदीपात्रात,, निर्माल्य व कचरा टाकून, घाण सांडपाणी सोडून, प्रातविधीसाठी वापर करणारे नदीपात्र आज कसे घाण झाले आहे याचे चित्र उभे केले.

रामखिलावनची भूमिका कौस्तुव चटर्जींनी तर नागनदी ललनवा, लखनवा ताऊ इ.च्या भुमिकेत शक्तीरतन दक्षा बोरकर, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसारकर, विष्णूदेव यादव, कल्याणी वैद्य यांचेसह अन्य कार्यकर्त्यांनी सुरेख साथ दिली.

यावेळी मेडीकल चौकातील पथनाटयाला धंतोली झोनच्या सभापती श्रीमती सुमित्रा जाधव, प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती सुजाता कोंबाडे, अति.उपायुक्त श्री.प्रमोद भुसारी, धंतोली झोनचे सहा.आयुक्त श्री.सुभाष जयदेव, हनुमाननगर झोनचे सहा.आयुक्त श्री.राजु भिवगडे, कार्य.अभियंता सतिश नेरळ यांचेसह धंतोली व हनुमाननगर झोनचे अधिकारी-कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

इतवारी रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार म.न.पा.आणि दक्षिण पूर्व मध्यरेल्वे यांच्यामध्ये सामंजस्य करार. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन आज द.पु.म.रेल्वे आणि म.न.पा. यांच्यामध्ये इतवारी रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छ ठेवण्याच्या दृश्टीने सामंजस्य करार (एम.ओ.यु.) करण्यात आला. म.न.पा.च्या राजे रघोजी भोसले नगरभवन महाल टाऊन हॉल येथे आज दुपारी मा.महापौर श्री.प्रवीण दटके व द.पु.म.रेल्वेचे मंडल रेल प्रबंधक

श्री.अमितकुमार अग्रवाल यांच्या उपस्थितीत द.पु.म.रेल्वे तर्फे वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) श्री.वाय.एच.राठोड यांनी तर म.न.पा.तर्फे अति.उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी याबाबतच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली यामध्ये जमा झालेला कचरा उचलने व रेल्वे लाईन परिसरात उघडयावर शौचास बसणार्यांवर कारवाई करण्याचा समावेश आहे.

यावेळी मंडल रेल प्रबंधक श्री.अग्रवाल यांनी महापौरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तर मान्यवरांचे स्वागत तुळशीचे रोपटे देवून करण्यात आले. याप्रसंगी शिक्षण समिती सभापती श्री.गोपाल बोहरे, गांधीबाग झोनचे सहा.आयुक्त श्री.अशोक पाटील, शिक्षणाधिकारी मीना गुप्ता, वैद्यकिय अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, उद्यान अधिक्षक श्री.सुधीर माटे, झोनल आरोग्य अधिकारी टेंभेकर आदी उपस्थित होते.







# दरवर्षी "आदीवासी महोत्सवाचे" आयोजन व्हावे...मा.महापौर प्रवीण दटके

नागपूर महानगरपालिका व दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केन्द्राच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्त शनिवार दि. 4 जुन 2016 रोजी सायंकाळी 7.00 वाजता फुटाळा तलाव परिसरात "आदिवासी महोत्सवाचा प्रारंभ गोंडी" गितांनी नगरीचे मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न झाला.

प्रारंभी मा.महापौरांनी गोंडी गितांचा आस्वाद घेऊन दिप प्रज्वलन करून आदिवासी महोत्सवाच्या पहिल्या दिवसाचे औपचारिक उद्घाटन केले. तदनंतर मा.महापौरांनी आदिवासींचे दैवत भगवान कुंवारा भिवसेन, बख्त बुलंदशहा आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले.

नागपूर महानगरपालिका व दक्षिण मध्य सांस्कृतिक केन्द्रातर्फे आयोजीत "आदिवासी महात्सावाच्या" पहिल्या दिवसाच्या उद्घाटनपर भाषणात मनोगत व्यक्त करतांना मा.महापौर श्री.प्रवीण दटके म्हणाले की, माजी महापौर व प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती मायाताई इवनाते यांच्या पुढाकाराने नागपूर शहरात व विदर्भात प्रथमच "आदिवासी महोत्सवाचे" आयोजन करण्यात आले असुन आदिवासी समाजाची संस्कृती जपण्यासाठी दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन फुटाळा तलाव परिसरात व्हावे. आदिवासीयांचे दैवत भगवान कुंवारा भिवसेन, संग्राम सिंह, राणी दुर्गावती आणि बख्त बुलंदशहा यांच्या सारख्या महान विभुतींच्या योगदानाचा ठेवा जपण्यास्तव 120 कलावंताकडून रविवार दि. 5 जुन 2016 रोजी कुंवारा भिवसेन हे महानाटय सादर करण्यात येणार आहे. या महानाटयाच्या समाजातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर पश्चिम नागपूरचे आमदार श्री.सुधाकर देशमुख, माजी आमदार ॲड. आशिष जैस्वाल, स्थायी समिती सभापती श्री.सुधिर राऊत, सत्तापक्ष नेते श्री.दयाशंकर तिवारी, बसपा पक्षनेता श्री.गौतम पाटील, मुस्लीम लीग पक्षनेता श्री.असलम खान, धरमपेठ झोनच्या सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, माजी महापौर व प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती मायाताई इवनाते, नगरसेविका सरस्वती सलामे, मिनाताई चौधरी, नगरसेवक सर्वश्री. जगदीश ग्वालवंशी, संदीप जाधव, गोंड राजे श्री.विरेन्द्र शहा, चिंतामण इवनाते, नंदलाल पंजवानी, के.के.शर्मा, अमीत कोवे, अतिरिक्त उपायुक्त श्री.प्रमोद भुसारी, आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री.हरिराम मडावी, धरमपेठ झोनचे सहा.आयुक्त श्री.राजेश कराडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

"आदिवासी महोत्सवाची" आठवण चिरकाल स्मरणात राहावी या हेतूने गोंडी पध्दतीने पिवळा दुपट्टा घालून व तुळशीचे रोप देवून व्यासपीठावरील सर्व गणमान्य अतिथींचे महोत्सवाच्या आयोजिका माजी महापौर व प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती मायाताई इवनाते यांनी स्नेहील स्वागत केले. यावेळी शबरी आदिवासी घरकुल योजना अंतर्गत 35 लाभाथ्र्यांना मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी पश्चिम नागपूरचे आमदार श्री.सुधाकर देशमुख यांनी आदिवासी समाज बांधवांकरिता समाजातील चालीरिती संदर्भात आदिवासी महोत्सवाचे आयोजन नागपूर शहरात व्हायला हवे याकरीता अथक परिश्रम घेतल्याबद्दल त्यांनी

शहराच्या प्रथम महिला आदिवासी महापौर श्रीमती मायाताई इवनाते यांचे अभिनंदन करून समाजातील तरूण पिढीने गोंडी भाषा अवगत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. स्थायी समिती सभापती श्री.सुधिर राऊत यांनी शहरात प्रथमच आयोजित होणाऱ्या आदिवासी महोत्सवाला म.न.पा.स्थायी समितीने 13 लक्ष रूपयाची तरतुद केल्याचे सांगितले. यावेळी बोलतांना सत्तापक्ष नेते श्री.दयाशंकर तिवारी म्हणाले की, पर्यावरणाचे संरक्षण करण्याकरीता आदिवासी समाजाचे योगदान फार मोठे असुन त्यांनी जल-जंगल-जमीन संस्कृती जिवंत ठेवल्याचे सांगुन एका चांगल्या कार्यक्रमाचा संकल्प माजी महापौर श्रीमती मायाताई इवनाते यांनी घेतल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाला प्रमोद कवरती, विजय कोमाते, सावन इवनाते, दर्शना डांगे, लताताई रोटके, रेखा कोरमकर, चन्द्रप्रभा मसराम, नलिनी तोडससह समाजातील आदिवासी गणमान्य नागरिकांसह मोठया संख्येने नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महोत्सवाच्या आयोजिका माजी महापौर व प्रभागाच्या नगरसेविका श्रीमती मायाताई इवनाते यांनी केले तर संचालन माधुरी धुर्वे व आभार प्रदर्शन महाराष्ट्र शासन आदिवासी सेवक पुरस्कार सन्मानित श्री.अमित कोवे यांनी केले.













# पावसाळा व्यवस्थेचे झोन निहाय नियोजन करा व यंत्रणा सज्ज ठेवा...... महापौर श्री.प्रवीण दटके

मान्सून पूर्व तयारीबाबत मा. महापौरांनी घेतला आढावा. आगामी पावसाळा लक्षात घेता कुठल्याही परिस्थितीत पावसाळयाचे व्यवस्थापन योग्य रित्या झाले पाहिजे त्यादृष्टीने सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी मान्सुनमध्ये होणाऱ्या संभावित अतिवृष्टीशी सामना करण्याकरीता झोन निहाय नियोजन करून यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी बैठकीत दिलेत. पावसाळा पूर्व तयारीबाबत विभागाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती जाणून घेण्याकरीता आज दिनांक 15 जून रोजी दुपारी 2.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी बैठकीला मा. उपमहापौर श्री. सतिश होले, सभापती स्थायी समिती श्री. सुधीर (बंडु) राऊत, परिवहन समिती सभापती श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समिती सभापती श्री. सुनिल अग्रवाल, अपर आयुक्त श्री. डॉ. आर.झेड. सिद्दीकी व डॉ. रामनाथ सोनवणे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, आरोग्य अधिकारी (एम.) डॉ. सविता मेश्राम, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, कार्यकारी अभियंता विद्युत श्री. संजय जैस्वाल, हिवताप अधिकारी श्रीमती जयश्री थोटे, अग्निशमन अधिकारी श्री.बी.पी. चंदनखेडे सह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त व झोनल अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी मा. महापौरांनी पावसाळयाची पूर्व तयारी झाली का? पंप दुरूस्ती झाली काय? डिझेल व्यवस्था व इमरजंन्सी गॅंग तयार करण्यात आली काय? याबाबतची विचारणा केली असता वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार यांनी माहिती देतांना सांगीतले की, इमरजन्सी गॅंगची तयारी पूर्ण झाली असून प्रत्येक झोन निहाय 1 निरिक्षक, 1 जमादार व 10 कर्मचारी सोबत ठेवण्यात आली असून यामध्ये लोककर्म विभागाचा प्रत्येकी 1 उप अभियंता, 1 कनिष्ठ अभिंयता, व 10 लेबरची व्यवस्था करण्यात आलेली असून पावडा, टिकास, दोर, सेक्शन पाईप, पंप, गाडयांचे ड्रायव्हर व डिझेलची व्यवस्था करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले.

यावेळी मा. महापौरांनी सहाय्यक आयुक्त व झोनल अधिकाऱ्यांकडून पावसाळा पूर्व तयारीचा झोन निहाय आढावा घेऊन असे निर्देश दिले की, झोन निहाय पाणी ओढणारे पंप सज्ज ठेवावे. धोकादायक रस्त्यावरील खड्डे त्वरीत बुजविण्यात यावे, तसेच बेसमेंट मध्ये पाणी साचणार नाही याकरीता संबंधीत फ्लॅट धारकांना व प्लॉट मालकांना नोटीस देऊन पाणी उपसण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात सूचना दयाव्यात. मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाल्यास जवळपासचा शाळांच्या (चाब्या) किल्ल्या आपले ताब्यात घ्याव्यात जेणेकरून त्याठिकाणी पूरग्रस्तांची व्यवस्था करता येईल.

सर्व सहा. आयुक्त यांनी आपातकालीन परिस्थितीमध्ये समर्थपणे कार्य करण्यास्तव झोन स्तरावर आवश्यक यंत्रणा सुसज्ज ठेवून प्रत्येक झोनमध्ये आपातकालिन कंट्रोल रूम तयार करावे. तसेच अग्निशमन विभागाने देखील 7 ही अग्निशमन स्थानकात वेगवेगळया दूरध्वनी फोनची व्यवस्था करावी. विद्युत विभागाने प्रत्येक इमरजन्सी गॅंगमध्ये 1 लाईन मन ठेवावा. तसेच झोन सभापतींना आमंत्रित करून डेमो दयावा असे निर्देश मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी दिलेत.

# नागपूर आणि चीनच्या जीनान शहरामध्ये तंत्रज्ञान, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात परस्पर सहकार्यासाठी सामंजस्य करार संपन्न...महापौर




भारत आणि चीन हया दोन देशांदरम्यान मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याच्या दोन्ही देशाच्या राजनैतिक परराष्ट्र धोरणास अनुसरून चीन मधील जीनान शहर आणि नागपूर शहर ही शहरे यापुढे मित्र शहरे (फ्रेंडशिप सिटी रिलेशन्स) म्हणून वाटचाल करणार आहेत. त्यादृष्टीने शैक्षणिक, सांस्कृतिक, माहिती तंत्रज्ञान व अन्य क्षेत्रात आदानप्रदान होवून त्याचा लाभ दोन्ही शहरांना मिळेल असा विश्वास मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी व्यक्त केला.

भारत आणि चीन या उभय देशांदरम्यान मैत्रीपूर्ण संबंध प्रस्तापित करण्याच्या दोन्ही देशांच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नागपूर महानगरपालिका आणि चीनच्या जीनान म्युनिसिपल पिपल्स रिपब्लीक यांच्या दरम्यान आज दिनांक 20 जून 2016 रोजी सायंकाळी म.न.पा.च्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहात झालेल्या बैठकीमध्ये महापौर श्री.प्रवीण दटके यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षातर्फे सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. म.न.पा.तर्फे आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर तर चीनच्या जीनान म्युनिसिपल पिपल्स रिपब्लीक तर्फे जीनान म्युनिसिपल पीपल काँग्रेसचे डायरेक्टर श्री.श्यु चँग्यु यांनी स्वाक्षरी केली. यावेळी उपमहापौर श्री.सतिश होले, स्थायी समिती सभापती श्री.सुधीर (बंडु) राऊत, सत्तापक्ष नेता श्री.दयाशंकर तिवारी, परिवहन समिती सभापती श्री.नरेन्द्र (बाल्या) बोरकर, मुस्लीम लिग पक्ष नेता श्री.असलम खान तर चीनच्या शिष्टमंडळात डप्युटी कान्सुल जनरल लिं युऑन लिंग, जिनान म्युनीसिपल पिपल काँग्रेसचे स्टँडींग कमेटी सेक्रेटरी लियू झियान, डेप्युटी डायरेक्टर जियांग डॉंग्यफँग, डेप्यूटी डायरेक्टर ग्युआंग्यू यिकून, बी बोहव, डिव्हीजन चीफ ग्यूओ, डेप्युटी डिव्हीजन चीफ श्रीमती झाव निंग, कॉमर्स बुरोचे चेन शुडॉंग, टेलीचायना चे सॉंग काई, आदी उपस्थित होते.

प्रारंभी मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी जिनान म्युनिसीपल चे डायरेक्टर श्री झ्यू चँग्यू व अन्य मान्यवरांचे तुळशीचे रोपटे, स्मृती चिन्ह व भेटवस्तु देवून स्वागत केले. त्यानंतर आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी नागपूर शहराचे

ऐतिहासिक, भौगोलिक, शैक्षणिक व अन्य सुविधांबाबत महत्व विषद करून सादरीकरण केले. त्यामध्ये स्मार्ट सिटी, दळणवळन सुविधा, वायफाय सिटी, नाग नदी स्वच्छता अभियान व प्रकल्प, जल व्यवस्थापन इ. ची माहिती दिली. त्यानंतर मा.महापौरांनी उभय देशाचे मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने या सामंजस्य कराराचे महत्व विषद केले. त्यानंतर जिनान शहराचे जिनान म्युनिसिपल पिपल्स रिपब्लीक तर्फे सादरीकरण करण्यात आले. सुमारे 70 लक्ष लोकसंख्या असलेल्या या शहरातील नदी विकास व शहराची रचना, गगनचुंबी इमारती व सुनियोजित विकास लक्ष वेधून घेत होता. जिनानचे डायरेक्टर हयु चँग्यू यांनी मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांना शैक्षणिक व अन्य क्षेत्रात आदान प्रदान करण्याच्या दृष्टीने नागपूर येथील विद्याथ्र्यांचे सांस्कृतिक, विद्याथ्र्यांना भेटीसाठी जिनान शहरात स्वागत आहे असे सांगितले तसेच जिनान शहराचे महत्व दर्शविणारे सांस्कृतिक चित्र मा.महापौर व अन्य मान्यवरांना भेट दिले.

यावेळी अति.आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, अति.उपायुक्त श्री.जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता श्री.उल्हास देबडवार, अधिक्षक अभियंता श्री.शशिकांत हस्तक, कार्य.अभियंता सर्वश्री. महेश गुप्ता, संजय गायकवाड, श्याम चव्हाण, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, सहा.संचालक (नगररचना) सुप्रिया थुल, उपसंचालक (लेखा परिक्षण) आमोद कुंभोजकर, सहा.आयुक्त सर्वश्री.प्रकाश वराडे, महेश मोरोणे, मिलींद मेश्राम, महेश धामेचा, नदया व सरोवरे प्रकल्प प्रमुख मोहम्मद इसराईल आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अति.आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे तर आभार अति.उपायुक्त श्री.जयंत दांडेगावकर यांनी मानले.



# व्यक्तिमत्व विकास मनःशांती व निरोगी जीवनासाठी योगाचा प्रचार व प्रसार करावा: केन्द्रीय मंत्री नितीन गडकरी

यशवंत स्टेडीयम येथे हजारो नागरिकांचे उपस्थितीत विश्व योग दिन उत्साहात संपन्न. मागील वर्षीपासून नागपूर येथे योग दिनाचे उत्साहपूर्ण वातावरणात व समर्पित भावनेतून आयोजन होत आहे ही आनंदाची बाब आहे. विशेषतः व्यक्तिमत्व विकास, मनशांती व निरोगी स्वास्थासाठी योगाचे महत्व सर्वांनी ओळखले असून देशातच नव्हे तर संपूर्ण जगात योगाला मान्यता मिळाली आहे. योग ही निरंतर चालणारी असल्याने नागपूरसह सर्व ठिकाणी वर्षभर कार्यक्रम आयोजित करून योगाचे प्रचार व प्रसार करावा असे आवाहन केन्द्रीय भुपृष्ठ परिवहन मंत्री मा.ना.श्री.नितीन गडकरी यांनी केले.

संयुक्त राष्ट्र संघाने 21 जून हा दिवस विश्व योग दिन म्हणून जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिका आणि जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, पतंजली योगपीठ, आर्ट आॅफ लिव्हींग, गायत्री परिवार, मैत्री परिवार, क्रीडा भारती, श्री रामचंद्र मिशन, सहजयोग ध्यान केंद्र, ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, एन.सी.सी., नागपूर जिल्हा योग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व शहरातील अन्य योगप्रेमी संस्थाच्या सहकार्याने मंगळवार दिनांक 21 जून 2016 रोजी सकाळी स्थानिक यशवंत स्टेडीयम, धंतोली येथे विश्व योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना ना.श्री.गडकरी बोलत होते.

यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित योगप्रेमींनी एकाचवेळी योगासने केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.प्रवीण दटके होते तर व्यासपीठावर मा.उर्जामंत्री तथा पालकमंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री. नागो गाणार, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, सुधाकर कोहळे, डॉ.मिलींद माने, कार्यक्रमाचे संयोजक व उपमहापौर श्री.सतीश होले, स्थायी समिती सभापती श्री.सुधीर (बंडु) राऊत, सत्तापक्ष नेता श्री.दयाशंकर तिवारी, म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे श्री.रामभाऊ खांडवे, बसपा पक्षनेता श्री.गौतम पाटील, स्थापत्य समिती सभापती श्री.सुनील अग्रवाल, क्रीडा समिती सभापती श्री.हरिष दिकोंडवार, शिक्षण समिती सभापती श्री.गोपाल बोहरे, धंतोली झोन सभापती श्रीमती सुमित्रा जाधव, प्रभाग क्रं.26 अ च्या नगरसेविका श्रीमती लता यादव, सह पोलीस आयुक्त राजवर्धन, अति.आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, पतंजली योग समितीचे यशपाल आर्य, यांचेसह संस्थाचे पदाधिकारी विराजमान होते.

यावेळी बोलतांना मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी विश्व योग दिन कार्यक्रमाचे आयोजनाबद्दल नागपूर महानगरपालिकेचे भूमिका विषद करून त्याबाबत सर्व संबंधितांनी दिलेल्या सहकार्याच्या विशेष रूपाने उल्लेख केला.

याप्रसंगी पतंजली समितीतर्फे प्रार्थना व प्राणायाम त्यानंतर श्रीरामचंद्र मिशनतर्फे ध्यानयोग, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळातर्फे योगासन व सूर्यनमस्कार, आर्ट ऑफ लिव्हिंग तर्फे ध्यान, प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे ध्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रारंभी प्रमुख अतिथी ना.श्री.नितीन गडकरी व अन्य मान्यवरांचे हस्ते दिप प्रज्वलन केल्यानंतर उपस्थित मान्यवरांचे तुळषीचे रोपटे देवून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे शेवटचे भागात नागपूर जिल्हा योग असोसिएशनच्या अनिल मोहगावकर यांच्या मार्गदर्शनात आंतरराष्ट्रीय योग पटू धनश्री लेकुरवाले व वैभव श्रीरामे यांचेसह लहान मुला-मुलींनी विविध प्रकारची चित्तथरारक योगासने सादर करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. त्यांचे मा.महापौरांनी तुळषीचे रोपटे देवून स्वागत केले.

कार्यक्रमाला एन.सी.सी विद्याथ्र्यांसह विविध संस्थाचे योग प्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सत्तापक्ष नेता श्री.दयाशंकर तिवारी यांनी तर आभार उपमहापौर श्री.सतिश होले यांनी मानले.








# नागपूर महानगरपालिका व अ.भा. मराठी नाटय परिषद, नागपूर शाखा आयोजित

## "महापौर करंडक"

## "राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धा - 2016"

| fnukd | ,dkfdk | laLFkk |
|---|---|---|
| 03 tqy] 2016 ldkGh 10%00 okts ikl- lu | lko/kku ,d ;kxdFkk | vEeP;vj vkVhLV dckbu] ukxij |
| | lk;yV fLØe | v/;;u Hkkjrh] o/kk |
| | vQ | iHkkr fØ,'ku] ukxij |
| | 1947 to AK 47 | Hkkokej] ukxij |
| | fo'ouVh | foÎyjko [kkcxM vkV dkel foKku eg-kfo|ky;] ukxij |
| | ;Kkgrh | Hkjr ukV; l'kk/ku eMG] i.k |
| 04 tqy] 2016 lk; 06%00 okts iklu | dGd.kh 0gll n'kikM | clkyh xi] ukxij |
| | Hkkjr vc ckdh g | cgtu jxHkeh] ukxij |
| | vkjlk | ek- Qy cgmíf'k; lLFkk] mejM |
| 05 tqy] 2016 lk; 06%00 okts iklu | cki gk ckip vlrk | lt; Hkkdj QkÅM'ku] ukxij |
| | ?kk;kG ik[kjk | v'o?kk"k dyk vdkneh] ukxij |
| | vHkx | v-Hkk-e-uk-i- egkuxj 'kk[kk] ukxij |
| 06 tqy] 2016 lk; 05%30 okts iklu | ?k'kh | nojtu cgmíf'k; lLFkk ukxij |
| | vk'khy | 'khy dyklkxj] ukxij |
| | fjtD'ku vkQ vkV | v0nr] vejkorh |
| | lk;dkGP;k dfork | fouk;djko n'ke[k gk;Ldy] ukxij |
| 07 tqy] 2016 lk; 05%30 okts iklu | uk;d | Jh f'kokth dyk o okf.kT; egkfo|ky;] ve-jkorh |
| | ,d vf/kd 'kU; | uVJ"B fuG Qy vkV QkÅM'ku vdkyk |
| | QfVyk;>j | Mk- jktnilkn ;ok dY;k.kdkjh lLFkk] mejM |
| | n"Vh | lg;kx dykor] o/kk |

| | | |
|---|---|---|
| 08 t y] 2016<br>l k; 05%30 ok t rk i k l u | Hk{kd | uR; foHkkx<br>Mk- ckck lkgc vkcMdj ejkBokMk<br>fo\|kihB] vkjxkckn |
| | dLVej dvj | vf[ky Hkkjrh; ejkBh ukV; ifj"kn]<br>'kk[kk /kG |
| | R;k oG.kkoj | Ýh cM ikMD'ku] ukxij |
| | VoVh VoVh | it.k jxHkeh] ukxij |
| 09 t y] 2016<br>l dkGh 08%00 ok t rk i k l u | tLV ykbd nV | vkox fØ;'ku] Bk.k |
| | onG | ukV;ukn] ecb |
| | rEgh or not to me | jxkn; #ikrj] ecb |
| | lYQh | vHk;ek] i.k |
| | nku vi.kkdkpk ,d i.kkd | oYdy fufer] iky?kj |
| | leoj VkGh | fi; dykdrh] i.k |
| | Between the Lines | vkxe] i.k |
| | [kG ekMh;yk | ;fru fØ,'ku] i.k |
| 10 t y] 2016<br>l dkGh 08%00 ok t rk i k l u | ik>j | vkG[k] lkxyh |
| | ckUlk; | e=h dyk ep] Mkfcoyh |
| | xk\|k vkf.k depk Qkl | uokfnrk] pnij |
| | y[kdkpk d=k | Work in Progress, Kalyan |
| | f0gDVkfj;l fMQhV | ukV; lok] ukf'kd 422001 |
| | rk] ikÅl vkf.k VkQjk | v'o fFk,Vj] ecb |
| | fn D;fj;l dl vkQ | jxni.k fFk,Vj ekUn] xkok |
| | Fkckp Viky | Lugyyhr] i.k |
| | tu& ty | ftjkQ fFk,Vl] uoh ecb |
| | ,dV leg | lØe.k] i.k |

स्थळ: सायंटिफीक सभागृह
आठ रस्ता चैक,
लक्ष्मीनगर, नागपूर

नागपूर महानगरपालिका, नागपूर

# नागपूर महानगरपालिका व अ.भा. मराठी नाटय परिषद, नागपूर शाखा आयोजित "महापौर करंडक" "राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धा - 2016"

नागपूर महानगरपालिका, नागपूर तथा अखिल भारतीय मराठी नाटय परिषद - नागपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महापौर करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा दिनांक 3 जुलै ते 10 जुलै, 2016 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेची सुरूवात प्राथमिक फेरीने पूर्व नियोजित कार्यक्रमाप्रमाणे दिनांक 26 जून, 2016 रोजी सकाळी 10:30 वाजता विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात झाली. महापौर करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा ही विविध एकांकिका स्पर्धांमधून दिनांक 1 जानेवारी, 2013 ते या स्पर्धेच्या प्रवेशिकेची अंतीम मुदत, दिनांक 25 जून, 2016 पर्यंत कोणत्याही निर्मितीचे पारितोषिक प्राप्त अव्वल ठरलेल्या एकांकिकांची स्पर्धा आहे.

प्राथमिक निवड फेरीनंतर आता प्रेक्षकांना व कलावंतांना एकाहून एक सरस अश्या एकुण 42 एकांकिकांच्या उत्कृष्ठ सादरीकरणाचा आस्वाद दिनांक 3 जुलै ते 10 जुलै 2016 या कालावधीत स्थानिक सायंटिफीक सभागृह, आठ रस्ता चैक, लक्ष्मीनगर येथे घेता येईल.

महापौर करंडक राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धेचे उदघाटन दिनांक 3 जुलै, 2016 रोजी सकाळी 10:00 वाजता मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांचेहस्ते  श्री. दीपक करंजीकर, नाटय/सिने कलावंत तथा प्रमुख कार्यवाह, अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, मुंबई यांचे विशेष उपस्थितीत पार पडणार आहे.